# रासेयोतर्फे जल साक्षरता जनजागृती रॅली



पुण्यनगरी / प्रतिनिधी

**सेलू :** जलसंवर्धनाचे महत्त्व लक्षात घेता यशवंत महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि रेडरिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १७ मार्चला 'जलमहोत्सव : गाव का उत्सव, देश का महोत्सव-२०२६' अंतर्गत विद्यार्थी तथा तसेच समाजामध्ये पाण्याचे जतन याबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने प्राचार्य डॉ. संदिप काळे यांच्या मार्गदर्शनात जल साक्षरता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना फाळके (डहाणे), सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी बकाने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात रॅलीने झाली. पाण्याचे महत्त्व, बचत आणि योग्य वापर याबद्दल प्राचार्य डॉ. संदिप काळे यांच्या हस्ते रॅलीची सुरुवात करण्यात आली. रॅली शहरातील प्रमुख रस्त्याने फिरुन विद्यार्थ्यांनी 'पाणी वाचवा, जीवन वाचवा', 'जल आहे तर भविष्य आहे', 'प्रत्येक थेंब मौल्यवान आहे', अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी फलक व बॅनरद्वारे नागरिकांचे लक्ष वेधले. रॅलीमध्ये पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे, असा संदेश दिला आणि नागरिकांनी या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद दिला. रॅलीनंतर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी कचरा गोळा करून प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत जनजागृती केली. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व इतर विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाला प्रा.जयश्री देशमुख, प्रा.भूषण तुरणकर, प्रा. योगेश पवार, प्रा. अर्चना बारंगे, प्रा. संगीता खोडे, प्रा.. प्रियंका राठोड, डॉ.अर्जुन खोब्रागडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी बकाने यांच्यासह प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# यशवंत महाविद्यालयात तळागाळातील महिलांचा सन्मान



**सेलू :** येथील यशवंत महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण कक्षद्वारा आयोजित जागतिक महिलादिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी घरगुती काम करणाऱ्या महिला, शासकीय रुग्णालय, सेलू येथील स्वच्छता करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वातीताई सुरेश देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रियंकाताई समीर देशमुख, ॲड. शिवानी सुरकार, मंजुषाताई बकाने, ॲड. कल्याणीताई पटले, प्राचार्य डॉ. संदीप काळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सीमा देशमुख यांनी केले. त्यानंतर इतरही उपस्थितांनी मार्गदर्शन केले. प्रसंगी तळागाळात काम करणाऱ्या महिला व सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोपटे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यामध्ये अर्चना देवतारे, लक्ष्मी बाकडे, जयश्री मुंगले, रत्नमाला गोल्हर, कमल दंडारे, शितल चाटे, सुमित्रा डोळसकर, सुप्रिया भांगे, ज्योती देवतारे, श्रद्धा गुर्वे, संगीता पायघन यांचा समावेश आहे.

प्रसंगी नवदाम्पत्य निकिता पवार व प्रा. योगेश पवार यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संचालन प्रा. जयश्री देशमुख, तर आभार प्रा. स्मीता बुरडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. अर्चना बारंगे, प्रा. संगीता खोडे, प्रा. किशोरी कोहाड, डॉ. दर्शना मेश्राम, प्रा. भूषण तुरणकर, प्रा. शैलेश बिसेन, किशोर धुर्वे,

देशोन्नती

www.deshonnati.wardha

- वर्धा | बुधवार | दि.१७ डिसेंबर २०२५



- ठाणेदार मनोज गभने यांचे प्रतिपादन
- यशवंत महाविद्यालय सेलू राष्ट्रीय सेवा योजनातर्फे कार्यक्रम

# वाहतूक नियमांची ओळख सुरक्षिततेचा पहिला टप्पा

देशोन्नती वृत्तसंकलन

**सेलू :** स्थानिक यशवंत महाविद्यालय सेलू येथील राष्ट्रीय सेवा योजना आणि पोलीस स्टेशन सेलू, यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालायाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदिप काळे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम अधिकारी डॉ, अर्चना फाळके (डाहाणे) यांनी 'रस्ता सुरक्षा अभियान' कार्यक्रम सह कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी बकाणे यांच्या सहकर्याने घेण्यात आला .

ठाणेदार मनोज गभने यांनी रस्ता सुरक्षा नियमांची माहिती देत, त्यात लोकांनी वाहतूक नियम, सीट बेल्ट, हेल्मेट वापरणे, स्पीड लिमिट, याचे महत्व सांगत रस्त्यावर वाहन चालवताना काय काळजी घ्यावी, सिग्नल पाळावे, झेब्रा क्रॉसिंगचा वापर कसा आणि केव्हा करावा वेगमर्यादा, वाहन चालकांची सुरक्षा याबद्दल मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षाची माहिती देण्यासाठी त्यांनी रस्ते अपघात टाळण्यासाठी गंभीर इजा किंवा मृत्यू होण्याची कारवाई होण्यापासून, वाहचालकांनी प्रशिक्षण घेणे याबद्दल स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

आज देशात एक लाख पेक्षा अपघताचे प्रमाण आहे आणि म्हणून या संपूर्ण अभियानात विद्यार्थ्यांचे युवकाचे आणि नागरीकांचे योगदान हे महत्त्वाचे आहे. सरकार ,पोलीस विभाग; स्थानिक प्रशासन, आणि नागरिकांनी एकत्र येऊन रस्ते सुरक्षा सुनिश्चित करण्यास प्रयत्न करावा, असे त्यांनी आवाहन केले. रस्ता सुरक्षा अभियान हा एक महत्त्वपूर्ण आणि देशभरात राबवल्या जाणारा कार्यक्रम आहे. जो रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन आणि रस्ता अपघात कमी करण्यासाठी चालवला जातो. या अभियानाचा मुख्य उद्देश वाहतूक सुरक्षा आणि लोकांमध्ये रस्ते सुरक्षिततेबद्दल जागृती निर्माण करणे हा होता.

रस्ता सुरक्षा अभियानाची मुख्य उद्दिष्टे लक्षात घेऊन पोलीस स्टेशन सेलू येथे येथील ठाणेदार मनोज गभणे, ट्राफिक पोलीस सुनील चावरे, संजय डगवार, जावेद थामिया , महिला पोलीस सोनाली मसरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना रस्ते सुरक्षा अभियानाच्या अंतर्गत येणाऱ्या वाहतूक नियमांच्या चिन्हाचे आणि नियमांचे महत्त्व समजावत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या संपूर्ण कार्यक्रमात महाविद्यालयीन प्रा. कोहाड , प्रा. खोडे, आणि महाविद्लयीन सर्व प्राध्यापक आणि स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले. **तालुका प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा अभियान हा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम

# राष्ट्रीय सेवा योजना ने एड्स को लेकर किया जनजागरण



**संवाददाता |** सेलू, स्थानीय यशवंत महाविद्यालय में राष्ट्रीय सेवा योजना और रेड रिबन क्लब के संयुक्त तत्वावधान में महाविद्यालय के प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप काले के मार्गदर्शन में एड्स जनजागृति कार्यक्रम का आयोजन किया गया था। कार्यक्रम के अध्यक्ष स्थान पर महाविद्यालय के इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ.अनंत रिंढे, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रश्मी बकाने, कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना फालके, सेलू के आयसीटीसी विभाग के कौन्सिलर अंकुश वाके उपस्थित थे। इस समय मार्गदर्शन करते हुए अंकुश वाके ने बताया की अनजाने में कुछ लोगो की ओर से कुछ बाते घटीत होते है। जिस से वे एड्स जैसे खतरनाक बिमारी के शिकार होते है। उन्होने एड्स इस खतरानाक बिमारी का संक्रमण होने से लेकर उसे टालने के बारे में मार्गदर्शन किया।अध्यक्षीय भाषण से डॉ. अनंत रिंढे ने एचआयव्ही इस शब्द का उच्चार करने पर भी हमारे मन में अलग अलग भावना निर्माण होते है।


**क्लासीफाईड**

**आवश्यकता है**

● आवश्यकता है अकाउंटेंट कम सुपरवाइजर की आवश्यकता है। पात्रता - 1. टॅली अकाउंटिंग का ज्ञान, 2. किसी स्टील ट्रेडिंग कंपनी में काम किया हो। वेतन 15,000/- से योग्यता अनुसार। संपर्क करें- वंश स्टील, नागपुर रोड, बायपास चौक, वर्धा। मो. 9822221559, समय दोप. 1 से 4 (40308/24 सि.)

6.6.1.2

# यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू

## समाज प्रबोधन कार्यक्रमांचे इतिवृत्त

**१) सभेची माहिती :**

- **दिनांक:** 01 / 04 / 2026
- **वेळ:** दुपारी 01 वाजता
- **स्थळ:** महाविद्यालय सभागृह
- **अध्यक्ष:** डॉ. संदीप भीमराव काळे (प्राचार्य)
- **उपस्थित सदस्य संख्या:** 15

---

**२) प्रस्तावना :**

यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू येथे विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवा वाढविण्यासाठी विविध समाज प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांना समाजातील महत्त्वाच्या विषयांबाबत जागरूक करणे, जबाबदार नागरिक बनविणे व सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणे हा होता.

**३) विषयानुसार इतिवृत्त व ठराव**

**विषय क्र. १ : वाहतूक नियमांची ओळख (दिनांक : 15 डिसेंबर 2025)**

**ठराव क्र. १ :**
दिनांक 15 डिसेंबर 2025 रोजी विद्यार्थ्यांसाठी वाहतूक नियमांची ओळख करून देणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात रस्ते सुरक्षा, वाहतूक चिन्हे, हेल्मेट व सीटबेल्टचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली.
विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले व अपघात टाळण्यासाठी आवश्यक दक्षता घेण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.
**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. २ : एड्स जनजागृती कार्यक्रम (दिनांक : 18 डिसेंबर 2025)**

**ठराव क्र. २ :**

दिनांक 18 डिसेंबर 2025 रोजी एड्स जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात HIV/एड्स विषाणू, त्याचा प्रसार, प्रतिबंधक उपाय व समाजातील गैरसमज दूर करण्याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना आरोग्यदायी सवयींचे पालन करण्यास प्रोत्साहित करण्यात आले व समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. ३ : जलसाक्षरता जनजागृती कार्यक्रम (दिनांक : 17 मार्च 2026)**

**ठराव क्र. ३ :**

दिनांक 17 मार्च 2026 रोजी महाविद्यालयात जलसाक्षरता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्त्व, पाणी बचतीचे उपाय व जलसंवर्धनाची गरज याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी पाणी संवर्धन, पावसाचे पाणी साठवण (Rainwater Harvesting) व पाण्याचा योग्य वापर याबाबत माहिती घेतली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली.

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**४) निष्कर्ष :**

वरील सर्व कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवा वाढल्या व जबाबदार नागरिक म्हणून त्यांची भूमिका अधिक बळकट झाली.

**५) आभार प्रदर्शन :**

सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांचे आभार मानण्यात आले.

**अध्यक्ष सही:** ____________

**अहवाल**

**विषय: समाजाचे समाधान**

शाळेमध्ये समाजाशी सुसंवाद राखून समाजाच्या विकासासाठी विविध **समाजप्रबोधन कार्यक्रम** प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे शाळा व समाज यांच्यातील नाते दृढ झाले असून समाजामध्ये शाळेबद्दल सकारात्मक भावना निर्माण झालेली आहे.

समाजप्रबोधनासाठी शाळेकडून **वृक्षदिंडी (वृक्षारोपण जनजागृती रॅली)** आयोजित करण्यात आली. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत समाजामध्ये हरित विचारांची जाणीव निर्माण केली.

तसेच वाहतुकीचे नियम याबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी फलक, घोषवाक्ये व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. यामुळे रस्ते सुरक्षा विषयी जागरूकता वाढली.

आरोग्य विषयक जनजागृतीसाठी **एड्स (AIDS) विषयक माहितीपर उपक्रम** राबविण्यात आले. या कार्यक्रमांद्वारे एड्स प्रतिबंध, सुरक्षितता व जागरूकता याबाबत समाजामध्ये माहिती प्रसारित करण्यात आली.

वरील सर्व उपक्रमांचे पुरावे म्हणून वृक्षदिंडी, वाहतूक नियम जनजागृती व एड्स विषयक कार्यक्रमांचे छायाचित्रे, वर्तमानपत्रातील प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचे कात्रण तसेच कार्यक्रमांचे इतिवृत्त सादर करण्यात आलेले आहेत. यावरून शाळेचा समाजाशी असलेला सक्रिय सहभाग व प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.